c/1

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# कृषि विज्ञान केंद्र

अजिंठा रोड, सागवन, बुलढाणा - ४४३ ००२ (महाराष्ट्र)

माकृअनुप
ICAR

डॉ.अमोल सुरेशराव झापे
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

फोन / फॅक्स- ९८२२९३०३५८
Email -kvkbuldhana@gmail.com

जा.क्र. वशाप्र/कृ.वि.कें.बुलढाणा/ 59 /२०२५

दिनांक: 28/04/2025

## दरपत्रक सुचना पत्र

प्रती,

.............................................

विषय : कृषि विज्ञान केंद्र ,बुलढाणा येथील प्रक्षेत्रावर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये बाह्यस्रोतामार्फत कंत्राटी पद्धतीने वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून (स्त्री-पुरुष) अकुशल मजुर लावण्यासाठी दर (निविदा) पाठविणेबाबत....

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,डॉ.पं.दे.कृ.वि.,विद्यापीठ अकोला अंतर्गत,कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम,दिवसपाळी/रात्रपाळी चौकीदारी संबंधित कामे अकुशल मजुरांमार्फत कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून अकुशल मजुरांचे (स्त्री-पुरुष) मजुरीचे निविदा दर खाली दिलेल्या प्रपत्रामध्ये भरून विहित मुदतीच्या आत(सोबत दिलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्रासह) या कार्यालयास सादर करावेत.

| अ.क्र. | विवरण | स्त्री-पुरुष अकुशल मजुर /चौकीदार | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन प्रति मजुर वेतन रु. | प्रति महिना प्रति मजुर वेतन रु. (३० दिवसांसाठी) | |
| १ | संस्थात्मक शेतीकरिता किमान वेतन | १८०.०० | ५४००.०० | |
| २ | सुधारित विशेष भत्ता | १४१.९६ | ४२५९.०० | |
| | एकुण किमान वेतन (किमान वेतन नियमाप्रमाणे) | ३२१.९६ | ९६५९.०० | |
| ३ | राज्य कामगार विमा (रा.का.वि.म. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (३.२५ %) | १०.४६ | ३१३.९१ | |
| ४ | कामगार भविष्य निर्वाह निधी कामगाराचे योगदान (१३ %) | ४१.८५ | १२५५.६४ | |
| ५ | एकुण रक्कम रु. | ३७४.२७ | ११२२८.५५ | |
| ६ | सेवाकर रु. | | | |
| ७ | एकुण रक्कम रु. | | | |

* वरील प्रपत्रात अकुशल मजुरांचे दर हे किमान वेतन कायद्यानुसार सादर करावेत.यापेक्षा कमी दर ग्राह्य धरण्यात येणार नाही.सदर दरपत्रके दि.०७/०५/२०२५ पर्यंत सायंकाळी ५ .०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत.

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख,
कृषि विज्ञान केंद्र,बुलढाणा.

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती:

१) निविदा / कोटेशन वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा यांच्या नावाने सीलबंद लिफाफा मध्ये पाठवावी.

२) कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे निविदेसोबत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

३) कमीत कमी एक वर्षाचा विद्यापिठात अथवा शासकीय संस्था/निमशासकीय कार्यालय यांना कंत्राटी मजुर पुरविल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत तसेच संबधित कार्यालयात काम समाधानकारक पुर्ण केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख/संबंधित व्यक्तीचे पुर्ण नाव व संपर्क क्रमाक इत्यादी सादर करावे.

४) कोणत्याही शासकीय,निमशासकीय/महामंडळाच्या काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र सादर करावे.

५) भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

६) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

७) ई.एस.आय. (Employees State Insurance Scheme) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

८) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

९) दरपत्रक समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१०) कंत्राटदाराने कंत्राटी मजुरांचे मासिक दर नमूद करताना Basic Wages + Variable Dearness यांच्या एकूण रकमेवर त्याला आकारावयाच्या त्याचे कमिशन गणना करणे अपेक्षित आहे.सारखे दर आल्यास संबंधितांना वाटाघाटी करिता बोलावून त्याचा अनुभव व वार्षिक उलाढाल इत्यादी बाबी विचारात घेऊन अंतिम निर्णय समितीचा असेल.

११) कंत्राटदाराने कंत्राटी मजुरांचे वेतन रोखीने अदा न करता Account Payee Cross Cheque द्वारे अदा करणे किंवा बँक खाते उघडून त्याचे मासिक वेतन त्याच्या बँक खातात पाच तारखेच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.

१२) कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदी पेक्षा कमी रक्कम नमूद करू नये.थोडक्यात कृषी विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारित केलेले किमान वेतन संबंधित कामगारास देणे बंधनकारक राहील.

१३) ज्या कंत्राटी मजुराचा भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक कार्यरत नसेल त्यांना कामावर ठेवू नये तसेच नवीन मजूर कामावर घ्यायचे असल्यास त्यांचा भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक कार्यान्वित करून घेणे बंधनकारक राहील.

१४) पी.एफ.,विमा योजना,बोनस,ग्रॅच्युईटी, कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार इत्यादी एक वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.याबाबतीत काही वाद निर्माण झाल्यास विभाग प्रमुख,वरिष्ठ शास्रज्ञ तथा प्रमुख, विद्यापीठ प्रशासन हस्तक्षेप करणार नाही अथवा कोणतीही जबाबदारी कार्यालयाची/विद्यापीठाची राहणार नाही

१५) कंत्राटदाराने कामगारास दरमहा अदा केलेल्या भविष्य निर्वाह निधी, गट विमा पावती व वेतनचिठ्ठी दरमहा संबंधित कार्यालयास देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्याचे पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१६) कंत्राटदाराने कामगारास दरमहा अदा केलेल्या भविष्या निर्वाह निधी, गट विमा पावती व वेतनचिठ्ठी दरमहा संबंधित कार्यालयास देणे बंधनकारक राहील तसे न केल्यास त्याची पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१७) कार्यालयाचे कामकाज सुट्टीच्या दिवशीही चालत असल्याने वेळोवेळी कंत्राटी मजुरांना सुट्टी देणे, कमी जास्त प्रमाणात कंत्राटी मजूर पुरवठा करणे व प्रत्येक कंत्राटी मजुराला साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील.

१८) शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील यासंबंधीची कुठलीही जबाबदारी कार्यालयाची राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१९) प्रत्येक कंत्राटी मजुरांना कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२०) कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा अपघात अथवा मृत्यू संपवल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदाहरणार्थ वीज, पाऊस, भूकंप, मशनरी अपघात, प्राणी/साप आणि वादळामुळे इजा अपघात मृत्यू संभवल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२१) कंत्राटी पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सब कॉन्ट्रॅक्टर/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदाराचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अमानत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यानंतर कार्यालयाच्या तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या दरपत्रक प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही. उपरोक्त कारणामुळे काही कायदेशीर बाबी उत्पन्न झाल्यास त्याचा कार्यालयाशी/विद्यापीठाशी काहीही संबंध राहणार नसून त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

२२) कंत्राटी मजुराने काम समाधानकारक रित्या न केल्यास त्याला त्या दिवशी परत पाठवण्यात येईल व कंत्राटदारास त्या दिवसाचे त्या कंत्राटी मजुराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

२३) कामात कचुराई,हलगर्जीपणा व अनुचित प्रकार केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच कार्यालयाचे नुकसान झाल्यास दंडासह भरपाई करावी लागेल.

२४) कोणतेही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे किंवा आलेले सर्व दरपत्रके नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवला आहे.आवश्यकतेनुसार एकावेळी एक महिना असे जास्तीत जास्त तीन वेळा सहमतीने कंत्राटाचा कालावधी वाढवता येईल.

२५) शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित दरपत्रक धारकाने भरणे बंधनकारक राहील. दरपत्रकांमधील दर कर समाविष्ट करून घ्यावेत.

२६) कंत्राट करारा संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्या संदर्भात अंतिम निर्णय विद्यापीठाचा राहील.

२७) उपरोक्त अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणारे ठेकेदार दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

२८) कंत्राटदाराने अटी शर्ती मान्य आहे असे रुपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.

२९) सदर दरपत्रक प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास अधिकार क्षेत्र बुलढाणा जिल्हा न्यायालय हे राहील.

३०) कंत्राटी मजुराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त असू नये.

३१) प्रक्षेत्रावरील कामे ही १२ महिन्यातील खरीप रब्बी व उन्हाळी या तीनही हंगामा करिता असून कामाचे दर ३१/०३/२०२६ पर्यंत वैध राहतील. तसेच विद्यापीठात काम केले म्हणून स्थायी बाबतचा दावा करता येणार नाही.

३२) कंत्राटदाराने करारनामा लिहून दिल्यानंतर मागणी केल्यानुसार कंत्राटी मजुर पुरविणे बंधनकारक राहील.तसे करण्यास ठेकेदार असमर्थ ठरल्यास नोंदणी रद्द करण्यास कामगार आयुक्त यांचेकडे शिफारस करण्यात येईल व त्याचे नाव काळ्या यादीत समावेश करून त्यानंतर कार्यालयाच्या तसेच कोणत्याही विद्यापिठाच्या निविदा प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही.

३३) कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा.हजेरी नोंद,दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते संबंधित अधिकाऱ्याकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

३४) कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक महिन्याचे वेतन पाच तारखेपर्यंत संबंधित कंत्राटी मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.एस.आय.सी.,पि.एफ, कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्यांचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलने प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३५) किमान वेतन व कामगार अधिनियमातील तरतुदीनुसार येणारे उत्तरदायित्व विचारात घेऊन विद्यापीठ परिपत्रक किमान वेतन दराचे अभिप्राय घेऊन निविदेचे दर ठरविले जातात.तसेच ठेक्यापोटी निम्यात येणाऱ्या कामगारांना किमान वेतन दराने देय रक्कम देणे बंधनकारक असल्याने, प्राप्त झालेल्या दरापेक्षा कमी येणारे निविदा दर केवळ सर्वात कमी दराचे आहे म्हणून स्वीकारले जाणार नाही. याची नोंद कंत्राटदाराने घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

३६) कंत्राटदाराने नियम व अटी काळजीपूर्वक वाचून या अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रपत्र निविदा सादरकर्त्यास निविदा सादर करतेवेळी जोडणे बंधनकारक राहील.

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख,
कृषि विज्ञान केंद्र बुलढाणा.

Scanned with OKEN Scanner